<u>परिपत्रक क्रमांक २८३ दिनांक ०८/०७/१९९३</u>

धर्मादाय संघटनेच्या सर्व विभागीय व उपविभागीय अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये मंडळ / संस्था नोंदणी बाबतचे प्रस्ताव कार्यालयात दाखल झाल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्यापुढील कामाचा व्याप पाहून व इतर बाबी लक्षात घेऊन एका ठराविक दिनांकास ठराविक वेळेस पक्षकारांना अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन घेण्यासाठी कार्यालयात बोलवावे. त्या विहित दिनांकाचे दोन दिवस अगोदर संबंधीत वरिष्ठ लिपिक व अधीक्षक यांनी कागदपत्रांची व्यवस्थित छाननी करुन त्यामध्ये असलेल्या त्रुटींबाबतची टिप्पणी संबंधीत अधिकाऱ्यांसमोर ठेवावी व त्याबाबतचे त्यांचे आदेश घ्यावेत. अर्जातील पूर्तता करुन घ्यावयाची असल्यास पक्षकाराला दिलेल्या तारखेला त्याप्रमाणे पूर्तता करुन घ्यावी व त्याच दिवशी अधिकाऱ्यांचे आदेश घेऊन नोंदणी प्रमाणपत्र पक्षकारांना देण्यात यावे. पक्षकारांना एकाच कामाकरिता पुन्हा पुन्हा कार्यालयात यावे लागणार नाही व जनतेला संस्था नोंदणीबाबत तक्रार करण्यास वाव रहाणार नाही, याची संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दखल घ्यावी.

संस्था नोंदणीचे कामाची वर नमुद केलेली पध्दत त्वरित सुरु करावी व त्याबद्दलचा अहवाल दिनांक १/८/९३ पर्यन्त या कार्यालयास पोहचेल अशा दृष्टीने सादर करावा.

क. मो. देसाई
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुंबई
दिनांक

प्रति,
१. धर्मादाय सह आयुक्त,
पुणे/औरंगाबाद/नागपूर
२. धर्मादाय उप आयुक्त
बृहन्मुंबई/कोल्हापूर/पुणे/नागपूर/भंडारा
३. सहायक धर्मादाय आयुक्त
सांगली/सातारा/सोलापूर/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/रायगड/नाशिक/अहमदनगर/जळगांव/धुळे/जालना/परभणी/नांदेड/लातूर/बीड/उस्मानाबाद/अमरावती/यवतमाळ/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली/अकोला
४. अधीक्षक देवस्थान शाखा माहितीकरिता